महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापने अंतर्गत योजनेत्तर योजनेमधील २ अस्थायी पदांस सन २०१९-२० मध्ये पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३६/फ-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ एप्रिल, २०१९

वाचा :-

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बांबूसा-२०१८/प्र.क्र.१२२/फ-९, दि.०४.०४.२०१८
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बांबूसा-२०१८/प्र.क्र.१२२/फ-९, दि.०४.१०.२०१८
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि. २१.०२.२०१९
४. मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-३/योजनेत्तर/प्र.क्र.६१/१८-१९/२०६३, दिनांक १६.०२.२०१९.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापने अंतर्गत योजनेत्तर योजनेखाली निर्माण करण्यात आलेल्या उपरोक्त २ अस्थायी पदास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील संदर्भ क्र.१ व २ अन्वये दिनांक ०१.०३.२०१८ पासून दिनांक २८.०२.२०१९ पर्यंत चालू ठेवण्याबाबत मुदतवाढ देण्यात आली होती. आता सन २०१९-२०२० मध्ये सदर २ पदे पुढे दिनांक ०१.०३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० पर्यंत चालू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.४ अन्वये शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

संदर्भ क्र.३ येथील वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांनी त्यांच्या आकृतिबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतिबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत अस्थायी पदे पुढे चालु ठेवण्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्यानुषंगाने, महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या स्थापने अंतर्गत योजनेतर योजनेमधील २ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास सोबत जोडलेल्या विवरण पत्रानुसार शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

या पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च २४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेतर), ०१ वनीकरण, १०५ वनउत्पादने, ०१ शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन, (०१) (०८) शासकीय महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना (२४०६ A१८५), (०१) वेतन या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० मध्ये उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा व मान्य होणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदींच्या मर्यादेतच उपरोक्त पदांसाठी खर्च करावा.

प्रस्तूत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक-पदनि २०१६/ प्र.क्र.०८/ १६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४०४१६०७१७४६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

VIJAYKUMAR VASUDEO PATIL

Digitally signed by VIJAYKUMAR VASUDEO PATIL
DN: CN = VIJAYKUMAR VASUDEO PATIL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2019.04.04 16:11:55 +05'30'

(वि. वा. पाटील)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. महालेखापाल १ / २ (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
६. वित्त विभाग/व्यय-१०, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
७. फ-९ कार्यासन, महसूल व वन विभाग (निवड नस्ती)

शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३६/फ-९, दिनांक ०४ एप्रिल, २०१९
सोबतचे विवरणपत्र

(दिनांक ०१.०३.२०१९ ते दिनांक ३०.०९.२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली पदे)

अ.क्र.	**पदनाम**	**एकूण**
१	**२**	**३**
१	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर	१
२	लिपिक	१
	एकूण	**२**

VIJAYKUMAR VASUDEO PATIL

Digitally signed by VIJAYKUMAR VASUDEO PATIL
DN: CN = VIJAYKUMAR VASUDEO PATIL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2019.04.04 16:12:22 +05'30'

(वि. वा.पाटील)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

****